I.I.F.-I (एकीकृत अन् वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल
(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. **District (जिल्हा):** वर्धा **P.S. (पोलीस ठाणे):** सिंडी **Year (वर्ष):** 2025

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0024 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 02/02/2025 03:07 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** मधले दिवस **Date from (दिनांक पासून):** 27/01/2025 **Date To (दिनांक पर्यंत):** 01/02/2025

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 18:56 तास **Time To (वेळेपर्यंत):** 16:12 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 02/02/2025 **Time (वेळ):** 02:00 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 005 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 02/02/2025 03:07 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** दक्षिण, 01 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** नंदी चौक , सिंदी रेल्वे ,सेलु

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

6.

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)**

**Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** प्रणय मारोती डुकरे

(b) **Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

(c) **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1999

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) **Occupation (व्यवसाय):**

(i) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | वार्ड क्र02 केजाजी , सेलु , सेलु , सिंडी, वर्धा, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | वार्ड क्र02 केजाजी , सेलु , सेलु , सिंडी, वर्धा, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-8007206280

**7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| **S. No. (अ.क्र.)** | **Name (नाव)** | **Alias (उर्फनाव)** | **Relative's Name (नातेवाईकाचे नाव)** | **Present Address(वर्तमान (पत्ता))** |
|---|---|---|---|---|
| 1 | मनोहर राजदासजी चांदेकर | | | 1. विठ्ठल मंदिर वार्ड न 3,Town/Village (शहर / गाव): हिंगणघाट,Tehsil (तहसील): हिंगणघाट,Police Station (पोलीस ठाणे): हिंगणघाट,District (जिल्हा): वर्धा,State (राज्य): महाराष्ट्र-442001,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

तक्रार देताच

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| **S. No. (अ.क्र.)** | **Propertty Category (मालमत्ता वर्ग)** | **Property Type (मालमत्ता प्रकार)** | **Description (विवरण)** | **Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये)** |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रु दराच्या पाच नोटा | 2,500.00 |
| 2 | इतर | संकीर्ण/विविध | तक्रारदाराचा फोटो 01 | .00 |
| 3 | इतर | संकीर्ण/विविध | सुचनापत्र रजीस्टर | .00 |
| 4 | इतर | घरगुती वस्‍ तु | गुन्हयाची डायरी | .00 |
| 5 | इतर | यंत्र–उपकरण/उपसाधन | तीन सँन्डीक्स कंपनीचे 32 GB चे मेमोरीकार्ड | .00 |

**10. Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :** 2,500.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| **S. No. (अ.क्र.)** | **UIDB Number (यु.आय.डी.बी.)** |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

नक्कल फिर्याद

कॅम्प सिंदी

(रेल्वे)जिल्हा वर्धा.

दिनांक 02/02/2025

मी प्रणय मारोती डुकरे, वय 26 वर्ष, व्यवसाय- रोजमजुरी, रा. वार्ड क्र. 2 केजाजी रोड, सेलु तह. सेलु जि. वर्धा, मो.क्र. 8007206280 दिनांक 27/01/2025 रोजी सायंकाळी 16.00 वाजता अरविंद राऊत, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग वर्धा यांचे कार्यालयात समक्ष हजर येवून एका लोकसेवकाविरूध्द लाच मागणी संबंधाने तक्रार असल्याबाबत माहिती दिली. अरविंद राऊत साहेब यांनी माझे तक्रारीवर पुढील कार्यवाही करण्यासाठी दोन शासकीय पंचांना कार्यालयात बोलावीले त्यानंतर मी दोन्ही पंचांचे समक्ष माझी लेखी तक्रार स्वःहस्ताक्षरात सादर केली. मी दिलेली तक्रार खालील प्रमाणे आहे.

तक्रार

प्रती,

मा. पोलीस उपअधिक्षक साहेब,

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वर्धा.

अर्जदारः- प्रणय मारोती डुकरे, वय 26 वर्ष, व्यवसाय- रोजमजुरी, रा. वार्ड क्र. 2 केजाजी रोड, सेलु तह. सेलु जि. वर्धा, मो.क्र. 8007206280

विषय :-एक लोकसेवक लाचेची मागणी करीत असल्याबाबत.

महोदय,

सविनय अर्ज सादर करतो की, मी वरील नमुद पत्यावर परीवारासोबत राहत असुन रोजमजुरीचे काम करतो. माझ्याकडे माझा मित्र मयुर शेंडे (मयत) याची टु व्हिलर गाडी क्रमांक एम.एच 49 एम 7242 मागील चार वर्षा पासुन माझे ताब्यात असुन ती मी वापरीत असतो.दिनांक 25/01/2025 रोजी अंदाजे सकाळी 11.00 वा. मी माझा मयत मित्र वैभव राऊत याचा PM रिपोर्ट मिळविण्याकरीता पोलीस स्टेशन सिंधी रेल्वे येथे विचारणा करणे करीता अंदाजे दुपारी 02.00 वा. चे दरम्यान मित्रांसोबत पोलीस स्टेशन येथे गेलो असता तेथील PSI श्री चांदेकर साहेब हे मला माझ्यावर दाखल अवैद्य दारू वाहतुकीच्या गुन्ह्याचा तपास करीत असुन त्यांनी पो.स्टे. सिंदी (रेल्वे) येथील त्यांच्या दालणात मला एकटयाला बोलावुन घेतले तेव्हा त्यांनी मला सांगितले की दिनांक 16.11.2024 रोजी सिंदी पोलीस स्टेशन येथे तुझ्या ताब्यात असलेल्या एम.एच 49 एम 7242 या गाडीवर अवैद्य दारूची वाहतुक करण्याची केस दाखल करण्यात आली आहे. त्याचा अपराध क्रमांक 0389/2024 कलम 65(अ),65(इ),व77(अ) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम 1949 असा आहे. तुझ्यावर अवैध दारू

वाहतुकीचा गुन्हा दाखल आहे.

तरी दारूच्या गुन्हयात तुला अटक न करण्या करीता तुला काहीतरी करावे लागेल कारण तुला फुकटात सोडणार नाही काही तरी खर्च पाणी करावे लागतील असे बोलुन मला फोटो व आधार कार्ड घेवुन दिनांक 27/01/2025 रोजी बोलवविले आहे.

तरी पोलीस स्टेशन सिंदी येथील PSI चांदेकर साहेब हे मला गुन्हयात अटक न करण्याकरीता लाच मागणी करत असल्याची माझी खात्री झाल्याने मला लाच देण्याची मुळीच इच्छा नसल्याने चांदेकर यांचेवर कायदेशीर कार्यवाही होणेस मी आपनाकडे तक्रार देत आहे. PSI चांदेकर यांचे सोबत माझे कोणतेही भांडन, वाद व वैमनस्य तसेच आर्थिक संबंध यापुर्वीच्या काळात झालेले नाही. कार्यवाही व्हावी हि विनंती. ठिकाण - लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, वर्धा दिनांक 27/01/2025 सही इंग्रजीत प्रणय मारोती डुकरे, रा. वार्ड क्र. 2 केजाजी रोड, सेलु जि. वर्धा, सहपत्र -FIR ची प्रत

यापमाणे माझी लेखी तक्रार असुन मी माझी तक्रार दिले वरून अरविंद राऊत साहेबांनी दोन्ही पंचा समक्ष मला तक्रारीचे कारण विचारले असता मी त्यांना व दोन्ही पंचाना थोडक्यात हकिकत माझी वरील लेखी तक्रार प्रमाणे सांगीतली. यांनतर अरविंद राऊत साहेबांनी यांनी माझी लेखी तक्रार वाचुन शहानिशा करणेकामी दोन्ही पंचांना दिली असता दोन्ही पंचानी लेखी तक्रार वाचुन व मला विचारपुस करुन मी सांगीतले नुसार लेखी तक्रारीत नमुद असलेबाबत जाहीर करुन सदरचे लेखी तक्रारीवर स्वाक्षरी केली व त्यानंतर अरविंद राऊत साहेबांनी सुध्दा माझे लेखी तक्रारीवर स्वाक्षरी केली.

दिनांक 27/01/2025 रोजी अरविंद राऊत साहेबांनी मला व दोन्ही पंचांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर व मेमरी कार्ड संबधाने माहीती देवुन लेखी तक्रारीत नमुदप्रमाणे गै.अ. श्री चांदेकर, पोलीस उपनिरीक्षक पो.स्टे. सिंधी जि. वर्धा यांनी मला अपराध क्रमांक 0389/2024 कलम 65 (अ),65(इ),व 77(अ) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम 1949 अन्वये माझेवर दाखल असलेल्या गुन्हयामध्ये अटक न करण्याकरीता लाचेची मागणी आहे कींवा कसे ? याबाबत पडताळणी करीता गै.अ. चांदेकर यांची भेट घेण्याकरीता माझेजवळ नविन मेमरी कार्ड टाकलेले व्हॉईस रेकॉर्डर देवुन माझे व नमुद गैरअर्जदार यांचेमधील भेटीदरम्यान होणारे संभाषण व्हॉईस रेकॉर्डरव्दारे मेमरी कार्ड मध्ये रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगुन अरविंद रातउ साहेबांनी दिलेल्या सुचनेवरुन सापळा पार्टीतील सदस्य यांनी मला तसेच दोन्ही पंचाना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चे गुणधर्माबाबत व नविन मेमरी कार्ड बाबत माहीती दिली.

त्यांनतर दिनाक 27/01/2025 रोजी गै.अ.चांदेकर यांची पोलीस स्टेशन सिंदी (रेल्वे) येथे जावुन लाच मागणी पडताळणीची शहानिशा करण्याचे सर्वानुमते ठरले.

यानंतर दिनांक 27/01/2025 रोजी अरविंद राऊत साहेबांच्या सुचनेवरुन सापळा पार्टीतील सदस्य यांनी मला पुन्हा एकदा डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर व मेमरी कार्ड संबधाने माहीती देवुन माझे लेखी तक्रारीत नमुदप्रमाणे गै.अ. चांदेकर, पोलीस उपनिरीक्षक, पो.स्टे. सिंदी रेल्वे यांनी मला अपराध क्रमांक 0389/2024 कलम 65 (अ),65(इ),व 77(अ) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम 1949 अन्वये माझेवर दाखल असलेल्या गुन्हयामध्ये अटक न करण्याकरीता लाच रक्कमेची मागणी आहे किंवा कसे ? याबाबत पडताळणी करीता गै.अ चांदेकर यांची भेट घेण्याकरीता माझेजवळ नविन मेमरी कार्ड टाकलेले व्हॉईस रेकॉर्डर देवुन माझे व नमुद गैरअर्जदार यांचेमधील भेटीदरम्यान होणारे संभाषण व्हॉईस रेकॉर्डरव्दारे मेमरी कार्ड मध्ये रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगुन अरविंद राऊत

साहेब यांचे सुचनेवरुन सापळा पार्टीतील सदस्य यांनी मला तसेच दोन्ही पंचाना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चे गुणधर्माबाबत व नविन मेमरी कार्ड बाबत माहीती देवुन सुस्थीतीत सुरु करुन माझे जवळ नविन मेमरी कार्ड टाकलेले व्हॉईस रेकॉर्डर वेळ 18.56 वा सुरु करुन गै.अ. यांचे भेटीस पंच क्र. 1 सह पोलीस स्टेशन सिंदी रेल्वे येथील गै.अ. यांचे कडे माझे कडील मोटार सायकल क्र. एम.एच.32 ए.यु. 5669 हिरो स्प्लेंडर ने सिंदी जवळील धोंडगाव कडे जाणा-या रोड वरील समृध्दी रोडचे खालील पुला खालुन पाठवुन आमचेतील संभाषण व्हॉईस रेकॉर्डर व्दारे मेमरी कार्ड मध्ये रेकॉर्ड करण्यात आले. गै.अ. चांदेकर यांची भेट घेवुन परत आल्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर 19.42 वा बंद करण्यात आले. त्यानंतर भेटीदरम्यान गै.अ. चांदेकर, पोलीस उपनिरीक्षक, पो.स्टे. सिंदी रेल्वे यांनी मला अपराध क्रमांक 0389/2024 कलम 65 (अ),65(इ),व 77(अ) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम 1949 अन्वये माझेवर दाखल असलेल्या गुन्हयामध्ये अटक न करण्याकरीता पोलीस उपनिरीक्षक, चांदेकर, पो.स्टे. सिंदी यांनी 2500/-रूपयांची लाच रक्कमेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारण्याची पंच क्र. 1 यांचे समक्ष तयारी दर्षविली. त्याबाबत डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरव्दारे मेमरी कार्डमध्ये रेकॉर्ड करण्यात आलेले आहे.

गैरअर्जदार पोलीस उपनिरीक्षक, चांदेकर यांची मला 2500/-रू लाचेची मागणी करुन स्विकारण्याची तयारी होती. सापळा अधिकारी श्री. अरविंद राऊत यांनी मला गै.अ. यांनी लाच मागणी केल्या प्रमाणे 2500/- रुपये लाच रक्कम हजर करण्यास दोन्ही पंचांचे समक्ष सांगीतले असता माझेकडे लाच रक्कम म्हणुन देण्या करीता पैसे नसल्याचे सांगीतले होते. मी त्यांना सेलु येथे माझे राहते घरी जावुन लाच रक्कम म्हणुन देण्याकरीता 2,500/- रुपये घेवुन येतो. असे सांगीतले होते. परंतु गै.अ. चांदेकर यांनी मला लागलीच 10 मीनीटमध्ये लाच रक्कम घेवुन येण्यास सांगीतले असल्याने मी अरविंद राऊत साहेब यांना दोन्ही पंचासमक्ष विनंती केल्यावरुन पुढील कार्यवाही दिनांक 28/01/2025 रोजी करण्याचा निर्णय अरविंद राऊत साहेबांनी दोन्ही पंचासमक्ष घेतला.

दिनांक 28/01/2025 रोजी श्री. अरविंद राऊत साहेबांनी पंचा समक्ष सापळा कार्यवाही समजावुन सांगत असतांना मला सापळा कार्यवाही कामी वापरण्यात येत असलेली लाच रक्कम हजर करण्याबाबत सांगीतले वरुन मी लाच रक्कम 2500/- ज्यात 500 रुपये दराच्या 5 चलनी नोटा अरविंद राऊत साहेबांकडे कडे पंचांचे समक्ष हजर केल्या. सदर नोटांना अँन्थ्राँसीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्यांचे सुचनेवरुन सापळा पार्टीतील सदस्य यांनी मला तसेच दोन्ही पंचाना अँन्थ्राँसीन पावडरचे गुणधर्माबाबत माहीती देवुन प्रात्यक्षीक देवुन नोटांवर पावडर लावण्यात आले. त्यानंतर सापळा अधिकारी अरविंद राऊत साहेबांनी आम्हास योग्य त्या सुचना देवुन अँन्थ्राँसीन पावडर लावलेल्या 500/-रु. दराच्या 5 नोटा तसेच नविन मेमरी कार्ड टाकलेले व्हॉईस रेकॉर्डर वेळ 11.40 वा. सुरु करून माझ्याजवळ गळयात अडकावुन देवुन अरविंद राऊत साहेब व सापळा पथक तसेच दोन्ही पंच थांबुन असलेल्या सिंदी जवळील धोंडगाव कडे जाणा-या रोड वरील समृध्दी रोडचे खालील पुला खालुन मी व पंच क्र. 1 असे माझे जवळील मोटार सायकल क्र. एम.एच.32 ए.यु. 5669 हिरो स्प्लेंडर ने गै.अ. चांदेकर यांना भेटण्याकरीता पोलीस स्टेशन सिंदी रेल्वे येथे रवाना झालो व आमचे पाठोपाठ सापळा अधिकारी अरविंद राऊत या त्यांचे स्टाफ व पंच क्रमांक 2 सह शासकीय वाहणाने आले. मी व पंच क्र. 1 असे पोलीस स्टेशन सिंदी रेल्वे जवळ पोहचल्या नंतर आमचे काही अंतरावर सापळा अधिकारी अरविंद राऊत यांनी त्यांचे वाहन थांबवून सापळा पथकातील

सहकारी कर्मचारी व पंच क्र. 2 चे सह सापळा लावला. मी व पंच क्र. 1 असे पोलीस स्टेशन सिंदी रेल्वे चे आत गेल्या नंतर तेथे मी गै.अ. चांदेकर हे कुठे आहे या बाबत हजर असलेल्या एका कर्मचा-यास विचारणा केली असता गै.अ. श्री. चांदेकर हे आज पोलीस स्टेशन मध्ये हजर नसल्याबाबत सांगीतल्याने मला दिलेल्या सुचने नुसार पंच क्र. 1 चे सह माझे जवळील मोटार सायकल ने सिंदी जवळील धोंडगाव कडे जाणा-या रोड वरील समृध्दी रोडचे खालील पुला खाली परत आलो माझे मागोमाग सापळा अधिकारी अरविंद राऊत व सापळा पथक हे त्यांचे जवळील वाहणाने परत आले. त्यानंतर माझे गळयातील व्हॉइस रेकॉर्डर बाहेर काढुन पंच क्र. 1 यांचे आवाजात 12.14 वाजता बंद केले.

त्यानंतर मला सापळा अधिकरी श्री. अरविंद राऊत यांनी घडलेल्या घटनाक्रम माझे समक्ष पंच क्र. 1 यांना विचारला असता गै.अ. हे पोलीस स्टेशन सिंदी रेल्वे येथे हजर नसल्याबाबत सांगीतल्याने सापळा अधिकारी श्री. अरविंद राऊत यांनी सापळा कार्यवाही स्थगीत करुन गै.अ. हे त्याचं पोलीस स्टेशन सिंदी रेल्वे येथे हजर असल्याबाबत माझा सापळा अधिकारी यांना फोन आल्यानंतर सापळा कार्यवाही करण्याचा माझे व दोन्ही पंचांचे समक्ष निर्णय घेतला.

दिनांक 01/02/2025 रोजी गै.अ. श्री. चांदेकर हे त्यांचे पोलीस स्टेशन सिंदी रेल्वे येथे हजर असल्याने श्री. अरविंद राऊत साहेब यांनी मला पंचा समक्ष पुन्हा एकदा सापळा कार्यवाही समजावुन सांगुन माझेकडे 5000/- रुपये लाच रक्कम ज्यात 500/- रुपये दराच्या 5 अॅन्थ्रॉसीन पावडर लावलेल्या चलणी नोटा सापळा अधिकारी अरविंद राऊत साहेब यांनी आम्हास योग्य त्या सुचना देवुन तसेच वरील नमुद पावडर लावलेल्या 500/-रु. दराच्या 5 नोटा तसेच नविन मेमरी कार्ड टाकलेले व्हॉईस रेकॉर्डर वेळ 15.53 वा. सुरु करून माझ्याजवळ गळयात अडकावुन देवुन अरविंद राऊत साहेब व सापळा पथक तसेच दोन्ही पंच थांबुन असलेल्या रेल्वे स्टेशन रोड ला लागुन असलेल्यान मैदानातील मंदीरासमोरुन मी व पंच क्र. 1 असे माझे जवळील मोटार सायकल क्र. एम.एच.32 ए.यु. 5669 हिरो स्प्लेंडर ने गै.अ. चांदेकर यांना भेटण्याकरीता पोलीस स्टेशन सिंदी रेल्वे येथे रवाना झालो व आमचे पाठोपाठ सापळा अधिकारी अरविंद राऊत हे त्यांचे स्टाफ व पंच क्रमांक 2 सह शासकीय वाहणाने आले. मी व पंच क्र. 1 असे पोलीस स्टेशन सिंदी रेल्वे येथे पोहचल्या नतर आमचे काही अंतरावर सापळा अधिकारी अरविंद राऊत यांनी त्यांचे वाहन थांबवून सापळा पथकातील सहकारी कर्मचारी व पंच क्र. 2 चे सह सापळा लावला. गै.अ. हे पोलीस स्टेशन मध्ये हजर नसल्याने मी त्यांना माझे मोबाईल वरुन त्यांचे मोबाईलवर फोन करुन विचारले असता त्यांनी मला पोलीस स्टेशनचे बाहेर येण्यास सांगीतल्याने मी पोलीस स्टेशनचे बाहेर रोडवर आलो. तेव्हा तेथे गै.अ. श्री. चांदेकर हजर होते. त्यांचे सोबत बोलणी केल्यानंतर त्यांनी मला चहा पिण्याकरीता चल असे म्हटल्याने मी त्यांचे गाडीच्या मागे मागे माझे जवळील खाजगी वाहणाने पंच क्र. 1 सह गेलो तेव्हा सापळा अधिकारी श्री. अरविंद राऊत हे आमचे गाडीचे मागे मागे त्यांचे खाजगी वाहणाने येत होते. गै.अ. यांनी त्यांची गाडी सिंदी रेल्वे येथील नंदी चौकात एका चहा टपरीवर थांबविली. गै.अ. चांदेकर, मी व पंच क्र. 1 असे आम्ही चहा पिवुन झाल्याचे नंतर मी गै.अ. यांनी मागणी केल्या प्रमाणे गै.अ. चांदेकर यांना माझे शर्टचे समोरील डाव्या बाजुच्या खिश्यातुन 2500/- रुपये लाच रक्कम माझे उजव्या हाताने काढुन देवुन गै.अ. यांनी त्यांचे उजव्या हातात असलेल्या न्युज पेपर वर ठेवुन लाच रक्कमेला उजव्या हाताच्या अंगठयाने दाबुन धरुन लाच रक्कम

स्विकारल्यानंतर मला सापळा अधिकारी यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी लाच रक्कम स्विकारलेबाबत नियोजीत ईशारा करताच सापळा अधिकारी अरविंद राऊत हे त्यांचे सोबतचे सापळा पार्टीतील सदस्यांसह माझे जवळ येवुन वेळ 16.12 वा त्यांनी व्हॉईस रेकॉर्डर पंच क्र 1 चे आवाजात बंद करून त्यांनी गै.अ. मनोहर चांदेकर, पोलीस उपनिरीक्षक, पोलीस स्टेशन सिंदी रेल्वे यांना ओळख देवुन व त्यांचे जवळ येण्याचे कारण सांगुण गै.अ. मनोहर चांदेकर यांना सापळा पार्टीतील सदस्यांचे मदतीने ताब्यात घेवुन अंगझडतीमध्ये त्यांचे कडुन 2500/- रुपये लाच रक्कम ताब्यात घेतली.

तरी आरोपी लोकसेवक श्री. मनोहर राजदासजी चांदेकर, वय 57 वर्ष, पद - श्रेणी पोलीस उपनिरीक्षक, पोलीस स्टेशन सिंदी रेल्वे, गृह विभाग, वर्ग - 3, रा. वार्ड न. 3, विठ्ठल मंदिर वार्ड, हिंगणघाट जिल्हा वर्धा यांनी मला अपराध क्रमांक 0389/2024 कलम 65 (अ),65(इ),व 77(अ) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम 1949 अन्वये माझेवर दाखल असलेल्या गुन्हयामध्ये अटक न करण्याकरीता पोलीस उपनिरीक्षक, चांदेकर, पो.स्टे. सिंदी यांनी 2500/-रूपयांची लाच रक्कमेची मागणी करुन नंदी चौक, सिंदी रेल्वे येथे पंचासमक्ष स्विकारुन भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 अंतर्गत गुन्हा केल्याने माझी त्याचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद संगणकावर टंकलीखीत करुन व त्याची प्रिंट काढुन ती मला वाचण्यास दिली. ती मी वाचुन पाहीली माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष

(अरविंद राऊत )
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वर्धा

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** santosh vithalrao darekar (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):**

**No. (क्र.): to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
**or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** santosh vithalrao darekar

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):**

**14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील)**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्मतारीख वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सें.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1968 | | - | | चेचक: क्र. |

| Deformities / Peculiarities (व्यंग वैशिष्टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल)**